**MHWR090010932024**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कारंजा (घा.), जि. वर्धा यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्रीमती दिक्षा दि. विघ्ने)**

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.४२/२०२४**

**सौ. पुजा अमित डोंगरे,**
वय २४ वर्षे, धंदा – घरकाम,
राह. व्दारा/ चंद्रशेखर ढोले यांचे घरी,
सावळी (खूर्द),
ता. कारंजा घा, जि. वर्धा ... **अर्जदार**

– **विरुध्द** –

**श्री. अमित धनराजजी डोंगरे,**
वय – ३२ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी,
राह. सावळी (बु.), ता. कारंजा घा.,
जि. वर्धा ... **गैरअर्जदार**

---

अर्जदारातर्फे – श्री. आर. व्ही. मस्के वकील
गैरअर्जदारतर्फे – श्री. डी. जी. टहेटवार वकील

---

## आदेश नि.क्र.५
## (दिनांक ०९/०९/२०२६)

प्रस्तूतचा अर्ज अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे गैरअर्जदाराविरुध्द दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असून त्यांचे लग्न दिनांक ०२.०६.२०२४ रोजी जगदंबा मंगल कार्यालय, ठाणेगांव येथे संपन्न झाले. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारकडे सावळी बु. ता. कारंजा घा. येथे वैवाहीक जिवण नांदविण्यास गेली. त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार हे दोघेही उमरेड येथे एकत्र राहायला गेले. गैरअर्जदार अर्जदारासोबत ४ ते ५ दिवस चांगले वागले. त्यानंतर अर्जदाराला सावळी येथे नांदावयास सोडून दिले. तिथे अर्जदाराने गैरअर्जदाराची आई, वडील, भाउ, बहीण यांचा एकत्र कुटूंबाचा संसार सांभाळला व घरातील कर्तव्य व जबाबदारी योग्य रित्या पार पाडीत होती. परंतु गैरअर्जदार हा या ना त्या कारणावरून अर्जदाराशी नेहमी भांडण करीत होता व वाईट शब्दात शिवीगाळ करीत होता. तसेच गैरअर्जदार हा अर्जदाराला लाथा भुक्याने मारहाण करीत होता. तसेच "तुला काम करता येत नाही, तु घर झाडत नाही, तुला स्वयंपाक करता येत नाही, घरी झाडू कशाला आणला, पोछा कशाला आणला, तु कपडयाने घर साफ का करीत नाही", असे म्हणायचा. तसेच अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेवून पाप लावीत होता. सोबतच अर्जदाराचे सासु–सासरे व विवाहीत ननद ती सुध्दा अर्जदाराच्या अंगावर मारण्यासाठी येत होते.

३. तसेच अर्जदाराने कथन केले की, गैरअर्जदाराचे दुस–या मुलीसोबत संबंध होते व आता सुध्दा संबंध आहे. त्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदाराच्या विनाकारण चुका काढून मारझोड करीत होता व शिवीगाळ करीत

होता. तसेच "तु मला शोभत नाही, तुझा बाप गुराखी आहे" असे म्हणायचा. तसेच त्याला विवाहबाहय संबंध ठेवायचे असल्याने अर्जदाराला म्हणत होता की, "तु मला पाहिजे नाही, तु घर सोडून जा". गैरअर्जदाराचे आई वडील त्याच्या वागण्याला दुजोरा देत असत. सदर बाब अर्जदाराने तिच्या माहेरी सांगितल्या नंतर गैरअर्जदाराने तिच्याशी समझोता करून गैरअर्जदाराच्या घरी सावळी येथे आणून दिले. परंतु तरी सुध्दा गैरअर्जदार, त्याचे आई वडील व बहीण हे अर्जदाराला चांगली वागणूक देत नव्हते. परंतु गैरअर्जदाराच्या स्वभावामध्ये बदल होईल अशी आशा अर्जदाराला होती. परंतु त्यांच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही.

४. अर्जदार पुढे कथन करते की, ती उमरेड येथे राहत असतांना गैरअर्जदार घरी आल्यावर अर्जदाराचा मोबाईल हिसकावून म्हणत असे की, "तु आज कोणासोबत बोलली". या कारणावरून तिच्याशी भांडण करायचे व माहेरच्या लोकांचा फोन आला, तर त्यांना फोन करून शिवीगाळ करायचे व अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेवून मारझोड करायचा. दिनांक २५.०६.२०२४ रोजी गैरअर्जदाराची आई, वडील, बहीण व मामा यांनी अर्जदारासोबत भांडण केले व तिला मारण्यासाठी अंगावर धावून गेले. अर्जदाराच्या घरच्यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांना सुध्दा घाणेरडया शब्दात शिवीगाळ केली. दरम्यानच्या काळात अर्जदार गरोदर राहली तेव्हा सुध्दा गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबियाकडून काही न काही कारणावरून वाद सुरू होता. तेव्हा सुध्दा गैरअर्जदार दारू पिवून अर्जदाराला मारझोड करायचे. तसेच गैरअर्जदाराची आई अर्जदाराला म्हणंत होती की, "तु वैश्या आहेस, तुला काम करता येत नाही, तु आमच्या घरी राहू नको, आमच्या मुलाला दुसरी बायको करून देवू, तु आमचे घर सोडून जा" असे म्हणायची व माहेरून पैसे आणण्याचा तगादा लावायची व सतत भांडण व मारझोड करायची. दिनांक ०५.१०.२०२४ रोजी सततच्या ताणतणावमुळे व अर्जदाराच्या गरोदरपणात काळजी न घेतल्यामुळे प्रकृती बिघडली. तेव्हा अर्जदार

उपचाराकरीता कारंजा घा. येथे गेली असता गैरअर्जदाराचे आई वडील व बहीण योगिता उकल्ले जी कारंजा येथे ग्रामिण रूग्णालयात आरोग्य सेविका आहे या सर्वांनी मिळून दिनांक १०.१०.२०२४ रोजी जबरीने अर्जदाराचा नऊ आठवडयाचा गर्भपात करावयास लावला. त्यानंतर दिनांक ११.१०.२०२४ रोजी अर्जदाराला तिच्या आई वडीलांच्या घरी आराम करावयासाठी सोडून दिले. तेव्हा पासून अर्जदार ही तिच्या आई वडीलांच्या दयेवर जिवण जगत आहे. गैरअर्जदाराने सदर कालावधीत अर्जदाराची कोणतीही आर्थिक मदत केली नाही व विचारपुस सुध्दा केली नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदार विरूध्द दिनांक २४.११.२०२४ रोजी पोलीस स्टेशन कारंजा येथे तक्रार दिली. अर्जदाराजवळ उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार हा भारत फायन्सस कंपनीमध्ये ए.व्ही.एम. या पदावर काम करीत असून त्याला या नोकरीतून प्रति माह ५०,०००/- रूपये पगार मिळतो. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्जदाराला दर महा खावटी म्हणून १५,०००/- अंतरिम पोटगी दयावी तसेच गैरअर्जदाराने सध्या व भविष्यात अर्जदाराला कोणताही मानसिक व शारिरीक त्रास देवू नये असा आदेश करण्याची प्रार्थना केली आहे.

५. प्रकरणाचे नोटीस प्राप्त झाल्यावर गैरअर्जदार प्रकरणात हजर झाले. त्याने नि.क्र.१० वर आपले लेखी उत्तर दाखल केले आहे. सदर लेखी बयाण नि.क्र.५ च्या अर्जाला उत्तर समजण्याची पुरसीस नि.क्र.३२ वर दाखल केली आहे. त्याने अर्जदाराचे त्याच्या सोबत असलेले नाते संबंध मान्य केले आहे. परंतु त्या व्यतिरीक्त अर्जातील सर्व कथने नाकारली आहे. त्याने सांगितले की, लग्नानंतर गैरअर्जदार हा अर्जदाराला त्याचे आई वडीलाकडे मौजा सावळी बु. येथे ठेवून आपल्या कामाच्या ठिकाणी उमरेड येथे राहत होता व दर शनिवारी अर्जदार व त्याच्या आई वडीलांना भेटण्याकरीता येत होता. त्याने लग्न जुळते वेळी सांगितले होते की, त्याचे नाव प्रमोशन लिस्टमध्ये आहे व त्यानंतर त्याला दुस-या ब्रांचमध्ये पाठविणार आहे. तेथे गेल्यावर रूम करून अर्जदाराला सोबत घेवून

जाणार. परंतु अर्जदाराला सावळी येथे गमत नव्हते त्यामुळे ती चार ते पाच दिवस झाले की, आपल्या माहेरी जाण्यासाठी गैरअर्जदाराला फोन करून त्रास देत होती. सदर कालावधीत गैरअर्जदार व त्याच्या आई वडीलांनी अर्जदाराला चांगल्याप्रमाणे वागविले व सर्व सुख सुविधा पुरविल्या. परंतु अर्जदाराला सावळी येथे गमत नव्हते व कोणत्याही कामात मन लागत नव्हते. गैरअर्जदाराची आई घरातील सर्व कामे करीत होती. गैरअर्जदाराच्या आईने अर्जदाराला कोणतेही काम सांगितले की, अर्जदार तिला म्हणायची की "मी तुमचे काम करण्यासाठी तुमच्या मुला बरोबर लग्न केले नाही, माझ्या आई वडीलांनी मला काम करण्यासाठी तुमच्या घरी पाठविले नाही". गैरअर्जदार दर शनिवारी घरी आल्यावर कपडे धुण्यासाठी आणत असे. अर्जदाराने केवळ एक–दोन वेळा कपडे धुतले परंतु त्यानंतर गैरअर्जदाराची आई स्वतः त्याचे कपडे धुवायची. गैरअर्जदार घरी गेल्यावर अर्जदार त्याला म्हणायची की, "मला या खेडेगावात एकत्र कुटूंबात राहायचं नाही, तुम्ही लवकर रूम करून मला सोबत लवकर घेवून चला", असे म्हणून भांडण करायची. तसेच गैरअर्जदाराचे कोणतेही विवाहबाहय संबंध नाही. गैरअर्जदाराने व त्याच्या आई वडीलांनी अर्जदाराला कधीही कोणत्याही प्रकारे त्रास दिला नाही. तसेच गैरअर्जदारची बहीण योगिता उकल्ले हिचे नागपूर येथे लग्न झाले असून ती आपल्या संसारात सुखी आहे व तिने कधीही अर्जदाराच्या वैवाहिक जिवनात हस्तक्षेप केला नाही.

६. गैरअर्जदार पुढे कथन करतो की, अर्जदार ही सावळी येथे राहत असतांना गर्भवती झाली व त्या नंतर ती गैरअर्जदाराला फोन करून मी येथे राहत नाही मला तुमच्या सोबत उमरेडला न्या असे म्हणून मानसिक त्रास देत होती. तसेच अर्जदार व तिचे आई वडील गैरअर्जदाराला त्याचे काहीही न ऐकता अश्लील शिवीगाळ करून "तुझे दुस–या मुली सोबत संबंध असतील, म्हणून तू माझ्या मुलीला सोबत नेत नाही", असे खोटे आरोप लावत असे. तसेच अर्जदार त्याला नेहमी म्हणायची की, "तुम्ही मला सोबत नेले नाही तर पोटातील बाळाचा

अबोरशन करून घेईल". त्यामुळे गैरअर्जदाराने रूम बघून दिनांक १७.०७.२०२४ रोजी अर्जदाराला उमरेड येथे नेले. तेथे राहत असतांना अर्जदार त्याला सकाळी उठून चहा, नाश्ता किंवा जेवण बनवून देत नव्हती. त्यामुळे गैरअर्जदाराला उपाशी कामावर जावे लागत होते. तसेच कामावरून आल्यावर सुध्दा अर्जदार ही स्वयंपाक करीत नव्हती व माझे पोट दुखत आहे, उलटी होत आहे असा बहाणा करून आपल्यासाठी मॅगी व नूडल्स बनवून खात असे. त्यामुळे गैरअर्जदाराला स्वतासाठी टिफिन लावावा लागला. अर्जदार ही सकाळी ९ ते १० वाजता उठायची व गैरअर्जदाराला फोनवर माझ्यासाठी हॉटेल मधून काही आणा असे म्हणायची. परंतू घरी स्वयंपाक करीत नव्हती. गैरअर्जदार कामावरून परत आल्यानंतर अर्जदार ही त्याच्या सोबत झोपत सुध्दा नव्हती व "माझ्या पोटात दुखत आहे, मला हे बाळ ठेवायचे नाही, मला त्रास होत आहे" असे म्हणायची. गैरअर्जदाने अर्जदाराला उमरेड येथे डॉ. वसुले यांचेकडे नेले होते व त्यांच्याकडे नियमित उपचार सुरू होता तेव्हा डॉक्टरांनी तिला सांगितले होते की, "काहीही प्रॉब्लेब नाही आहे व सर्व नॅचरल आहे". तरीसुध्दा अर्जदार ही कोणत्याही कामाला हात लावत नव्हती व अबॉरशन करण्यासाठी दबाव टाकत होती. अर्जदार हीला बाळ ठेवायचे नसल्यामुळे तिने आपल्या आई वडीलांना फोन करून बाळ ठेवायचे नसल्याबाबत सांगितले. तेव्हा अर्जदाराच्या आई वडीलांनी गैरअर्जदार व त्याच्या आई वडीलांना अश्लील शिवगाळ केली व अबॉरशन केले नाही तर आम्ही तुमच्या सगळया कुंटूबांना खोटया केसमध्ये फसवू असे सांगितले.

७. गैरअर्जदार पुढे कथन करतो की, दिनांक ०१ ऑक्टोबर रोजी अर्जदाराच्या वडीलांनी गैरअर्जदाराला फोन करून म्हटंले की, मी माझ्या मुलीला नेतो व त्या नंतर दुस–या दिवशी गैरअर्जदार कामावर गेले असता अर्जदार तिच्या भाउ सोबत निघून गेली. गैरअर्जदाराने थांबविण्याचा प्रयत्न केला परंतू अर्जदाराने काहीही न ऐकता निघून गेली. त्यानंतर अर्जदार गर्भपात करण्यासाठी डॉ. कळंबे

यांच्या दवाखान्यात गेली व तिथून गैरअर्जदाराला फोन करून बोलवले. अर्जदार दवाखान्यात गेली असता डॉक्टरांनी त्यांना सांगितले की, तुमच्या पत्नीला हे बाळ ठेवायचे नाही त्यामुळे तुम्ही येथे हजर राहणे आवश्यक आहे. डॉ. कळंबे यांनी अर्जदाराला डॉ. पावडे यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला. डॉ. पावडे यांच्याकडे जास्त खर्च होईल असे सांगितल्यामुळे सरकारी दवाखाना कारंजा घा. येथे दिनांक ०९.१०.२०२४ रोजी अर्जदार भरती झाली व स्वतःच्या संमतीने गर्भपात केले. त्याकरीता कोणीही बळजबरी व दबाव केला नव्हता. अर्जदार ही स्वतः दिनांक ०१.१०.२०२४ पासून आपल्या माहेरी राहत आहे. तिने सोन्याचे दागिने सोबत नेले होते. तेव्हा पासून गैरअर्जदार व त्याचे आई वडील पाच ते सहा वेळा अर्जदाराच्या वडीलांच्या घरी गेले परंतू अर्जदाराने काहीही न एकता सोडचिठ्ठीची मागणी करून परत पाठविले. अर्जदाराचे माहेरची आर्थीक स्थिती सधन व श्रीमंत असून तिला गैरअर्जदाराकडे नांदण्याची ईच्छा नाही. तिने तिच्या आई वडीलांच्या ईच्छेमुळे गैरअर्जदारासोबत लग्न केले. त्यामुळे ती वारंवार गैरअर्जदारासोबत वाद घालीत असे. अर्जदार ही हष्टपुष्ट असून स्वतःचे शिवणक्लास चालवते व त्यापासून २५,०००/– रूपये प्रतिमहा उत्पन्न कमविते. गैरअर्जदर हे बेरोजगार असून त्याच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे तो अर्जदाराला दरमहा १५,०००/– पोटगी देवू शकत नाही. तसेच अर्जदार ही स्वतःच्या मर्जीने माहेरी राहत असल्यामुळे तिला गैरअर्जदाराकडून खावटी खर्च, स्वतंत्र निवासाची व्यवस्था व ईतर खर्चाची मागणी करण्याचा अधिकार नाही त्यामुळे अर्जदाराचा अर्ज खोटया आधारावर असल्यामुळे खारीज करण्यात यावा अशी प्रार्थना केली आहे.

८. अर्जदाराचे व गैरअर्जदाराचे कथन व त्यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद यावरून माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थीत होतात. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे देत आहे.

म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.४२/२०२४

पुजा डोंगरे वि. अमित डोंगरे

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार केला आहे, असे अर्जदार प्रथम दर्शनी सिध्द करते काय? | ...होय. |
| २. | अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण मिळण्यास पात्र आहे काय ? | ... होय. |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदारापासून दरमहा १५,०००/- रूपये अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | ...अंशतः होय. (गैरअर्जदार कडून रक्कम रुपये ५,०००/- ) |
| ४. | आदेश काय? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

९. अर्जदाराने सदर प्रकरणामध्ये तिची बाजू प्रथम दर्शनी सिध्द करण्याकरीता लग्नाची पत्रीका, सुचनापत्र, अदखल पात्र गुन्हयाची प्रत, अबॉरशन अहवाल, पोस्टाचा ट्रॅकींग रिपोर्ट, पोस्टाची पावती, नोटीस, आधार कार्ड ईत्यादी दस्ताऐवज दाखल केले आहे. तसेच सरंक्षण अधिकारी यांनी घटनेचा घटना चौकशी अहवाल नि.क्र.२५ वर दाखल केला आहे. याउलट गैरअर्जदाराने अर्जदाराच्या गर्भपाताचे वैद्यकीय दस्ताऐवज दाखल केले आहे.

### मुद्दा क्र.१ करीता-

१०. या मुद्दामध्ये अर्जदार हिला प्रथम दर्शनी सिध्द करणे गरजेचे आहे की, ती गैरअर्जदार सोबत एकत्र कुटूंबात नांदत असतांना गैरअर्जदाराने तिच्यावर कौटूंबिक हिंसाचार केला. सदर बाब सिध्द करण्याकरीता तिने कथन केले की, लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार हा तिला दारू पिवून शिवीगाळ व मारहाण करीत

होता. तसेच या किंवा त्या कारणावरून वाद घालीत होता. तसेच तो अर्जदाराला काम करता येत नाही, स्वयंपाक करता येत नाही या गोष्टीवरून सुध्दा भांडण व मारहाण करीत होता. तसेच अर्जदार ही तिच्या आई वडीलांसोबत फोनवर बोलली तर त्यांना सुध्दा फोन करून शिवीगाळ करीत असे. सोबतच अर्जदाराच्या चारीत्र्यावर संशय घेत असे. सदर बाब प्रथम दर्शनी सिध्द करण्यासाठी अर्जदाराने अदखल पात्र गुन्हयाची प्रत दाखल केली आहे. सदर दस्ताऐवजाची पाहणी केली असता त्यामध्ये सुध्दा गैरअर्जदार हा अर्जदाराला मारझोड व शिवीगाळ करीत असल्याचा मजकूर आला आहे. तसेच त्याचे आई वडील सुध्दा अर्जदाराला बिमार राहते व घरातील कामधंदे करीत नाही म्हणून त्रास देत होते, असा मजकूर आलेला आहे. सोबतच संरक्षण अधिकारी यांनी दाखल केलेला घटना चौकशी अहवालमध्ये सुध्दा गैरअर्जदार हे अर्जदाराच्या घरी येवून तिच्या वडीलांना व नातेवाईकांना जोर जोरात ओरडून शिवीगाळ करीत असल्याची बाब व अर्जदाराला “तु आता पाहिजे नाही, तु सोडचिठ्ठी देवून दे” असे म्हणत असल्याची बाब आलेली आहे. या दस्तावरून अर्जदाराच्या अर्जातील कथने प्रथम दर्शनी सिध्द झाल्याचे दिसून येते. कारण सदर दस्ताऐवज अर्जादाराच्या अर्जातील कथनांना दुजोरा देत आहे.

११. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदारांनी बळजबरीने तिचा गर्भपात करून घेतला परंतू गैरअर्जदाराने दाखल केलेले वैद्यकीय दस्ताऐवज पडताळले असता अर्जदाराने गर्भपातला संमती दिल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. त्यामुळे ही बाब प्रथम दर्शनी सिध्द होत नाही की, गैरअर्जदार व त्याच्या कुटूंबियाने बळजबरीने अर्जदाराचा गर्भपात करून घेतला. परंतु गैरअर्जदार हे अर्जदाराला शिवीगाळ व मारहाण करून तिचा शारिरीक हिंसाचार करीत असल्याची बाब अदखल पात्र गुन्हयाची प्रत व घटना चौकशी अहवाल या दस्तावरून प्रथम दर्शनी सिध्द होते. सोबतच गैरअर्जदाराच्या लेखी उत्तरावरून असे दिसून येते की, अर्जदार ही घरातील कामे करीत नसल्यामुळे त्या गोष्टींचा त्रास गैरअर्जदाराला

होत होता. त्यामुळे अर्जदार ही घरातील कामे करीत नाही, म्हणून ती चांगली पत्नी म्हणून वागत नव्हती असे गैरअर्जदाराचे मत असल्याचे त्याच्या उत्तरावरून दिसून येते. परंतू ही बाब लक्षात घेणे महत्वाचे आहे की, अर्जदार ही गर्भवती होती व सदर कालावधीमध्ये शारिरीक बदल घडत असल्यामुळे थकवा, उलटी ईत्यादी गोष्टी होणे स्वाभाविक आहे. या सर्व बाबी समजून घेण्याऐवजी गैरअर्जदार त्याच्या लेखी उत्तरामध्ये सांगतो की, अर्जदार ही उलटीचा बहाणा करून त्याला जेवन बनवून देत नव्हती. यावरून सुध्दा असे दिसून येते की, गैरअर्जदार हा अर्जदाराला समजून घेण्याऐवजी तिच्या कडून केवळ कामाची अपेक्षा करीत होता. हा सुध्दा भावनिक हिंसाचार असुन कौटुंबिक हिंसाचाराचा प्रकार आहे. यावरून असे दिसते की, अर्जदाराने तिच्यावर होत असलेला कौटूंबिक हिंसाचार प्रथमदर्शनी सिध्द केला आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी दर्शविते व त्याप्रमाणे निष्कर्ष देते.

**मुद्दा क्र. २ करिताः–**

१२. सदर प्रकरणात गैरअर्जदार याने अर्जदाराचा शारीरीक व भावनिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे मुद्दा क्र.१ वरून प्रथम दर्शनी सिध्द झाले आहे. अश्या वेळेस तिच्यावर होत असलेला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण आदेश पारीत करून थांबविणे न्यायोचित होईल. सबब मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी दर्शवून त्याप्रमाणे निष्कर्ष देत आहे.

**मुद्दा क्र. ३ करिताः–**

१३. अर्जदाराने तिच्या अर्जात कथन केले की, गैरअर्जदार हा भारत फायनंस कंपनीमध्ये ए.व्ही.एम. या पदावर काम करीत असून त्याला प्रतिमहा ५०,०००/– रूपये पगार मिळतो. गैरअर्जदाराने त्याच्या लेखी उत्तरामधून सदर बाब नाकारली आहे व कथन केले की, तो सध्या बेरोजगार असून त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट अर्जदारही शिवण क्लास चालविते व त्या

पासून २५,०००/– रूपये महिना कमाविते असे कथन केले आहे. लेखी उत्तरासोबत गैरअर्जदाराने त्याचे मत्ता व दायित्वाचे प्रमाणपत्र नि.क्र.११ वर दाखल केले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या लेखी उत्तरात तो बेरोजगार असून उत्पन्नाचे साधन नाही असे कथन केले आहे. याउलट त्याने त्याच्या मत्ता व दायित्व प्रमाणपत्रामध्ये त्याचे महिन्याचे उत्पन्न २४,०००/– रूपये असल्याचे नमूद केले आहे. परंतु त्याला ते उत्पन्न कशापासून मिळते याबाबत काहीही नमूद केले नाही. तसेच त्याच्यावर त्याचे आई वडील यांची पालनपोषनाची जबाबदारी असल्याचे सुध्दा कथन केले आहे. यावरून असे दिसते की, गैरअर्जदारने त्याच्या लेखी उत्तरामध्ये त्याचे सध्या बेरोजगार असल्याची बाब चुकीची नमूद केली आहे. कारण जर गैरअर्जदार बेरोजगार असता तर त्याचे महिन्याचे उत्पन्न २४,०००/– रूपये असल्याचे नमूद केले नसते. सदर लेखी उत्तर व मत्ता व दायित्व दिनांक ०५.०४.२०२५ रोजी दाखल केल्यानंतर गैरअर्जदाराने दिनांक ०१.१०.२०२५ रोजी नि.क्र.२० वर त्याच्या आर्थिक परीस्थितीमध्ये बदल झाल्यामुळे पुर्वी दाखल केलेले मत्ता व दायित्वाचे दस्त रद्द करून नविन मत्ता व दायित्व दाखल करण्याची परवानगीचा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने कथन केले की, दिनांक ०६.०६.२०२५ रोजी त्याची नोकरी सुटलेली आहे व त्याच्याकडे कोणतेही स्थिर उत्पन्न नाही. जर त्या अर्जातील कथनाप्रमाणे दिनांक ०६.०६.२०२५ रोजी त्याची नोकरी सुटलेली आहे तर लेखी उत्तर दाखल करतांना म्हणजेच दिनांक ०५.०४.२०२५ रोजी त्याच्या जवळ नोकरी होती व उत्पन्नाचे साधन होते ही बाब प्रथम दर्शनी सिध्द होते. यावरून सुध्दा दिसून येते की, गैरअर्जदाराने त्याच्या लेखी उत्तरात बेरोजगारीचा चुकीचा मजकूर कथन केला आहे.

१४. सोबतच गैरअर्जदाराच्या नोकरीबाबत सध्या स्थिती माहीती करून घेण्याबाबत अर्जदाराने नि.क्र.२२ वर अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज मंजूर करून भारत फायनंस, एन.बी.एफ.सी. उमरेड यांना पत्र पाठविण्यात आले होते.

सदर पत्र प्राप्त होवून सुध्दा भारत फायनंस, एन.बी.एफ.सी. उमरेड यांनी सदर पत्राला कोणतेही उत्तर दिले नाही. तसेच गैरअर्जदाराने सुध्दा त्याची नोकरी सुटल्याबाबत समाप्ती पत्र दाखल केलेला नाही. यावरून असे दिसते की, गैरअर्जदार याची नोकरी कायम असून त्याच्या जवळ उत्पन्नाचे साधन आहे व केवळ मासिक खावटी टाळता यावी या उद्देशाने गैरअर्जदाराने त्याची नोकरी सुटली असून त्याच्या जवळ उत्पन्नाचे साधन नाही, असे कथन केले आहे.

१५. वरील बाबींवरून हे सिध्द होते की, गैरअर्जदार जवळ उत्पन्नाचे साधन आहे. परंतु त्याला किती उत्पन्न मिळते याबाबत कोणताही प्रथम दर्शनी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे त्याच्या मत्ता व दायित्वप्रमाणे त्याला दरमहा २४,०००/– रूपये उत्पन्न मिळते असे गृहीत धरण्यात येते. तसेच त्याच्यावर त्याच्या आई वडीलांची सुध्दा जबाबदारी असल्याचे दिसून येते. परंतु पती म्हणून अर्जदाराची पालनपोषनाची जबाबदारी ही सुध्दा गैरअर्जदाराची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे ती पुर्ण करण्यासाठी गैरअर्जदाराने अर्जदाराला मासिक पोटगी देणे गरजेचे आहे. सध्या परीस्थितीत दररोज लागणा–या किमान गरजांचा विचार केला असता व गैरअर्जदारावर असलेल्या जबाबदारीचा विचार केला असता अर्जदार ही दरमहा ५,०००/– रूपये पोटगी मिळण्यास पात्र आहे. सबब मी मुद्दा क्र.३ चे उत्तर अंशतः होकारार्थी दर्शवते व त्याप्रमाणे निष्कर्ष नोंदविते.

**<u>मुद्दा क्र.४ करिता :–</u>**

१६. मुद्दा क्र.१ ते ३ च्या कारणमिमांसा व निष्कर्षांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र.४२/२०२४**
**पुजा डोंगरे वि. अमित डोंगरे**

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदाराला आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार हिच्यावर कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये, तसेच संरक्षण अधिकारी/पोलीस अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदाराला आवश्यकता असल्यास संरक्षण द्यावे.

३. गैरअर्जदारास आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ५,०००/- (पाच हजार) प्रमाणे अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दि.२६/१२/२०२४ पासुन अर्जदारास अदा करावी.

४. अर्जदार, गैरअर्जदार व संरक्षण अधिकारी यांना या आदेशाची प्रत मोफत देण्यात यावी.

DIKSHA DINESH VIGHNE
Digitally signed by DIKSHA DINESH VIGHNE
Date: 2026.09.11 15:25:07 +0530

दिनांकः ०९/०९/२०२६

ठिकाण : कारंजा (घा.)

**(दिक्षा दि. विघ्ने)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,कारंजा (घा.)
जि. वर्धा